निवृत्तीदिनी 'पीएफ'!

खासगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना केंद्राची भेट

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

खासगी क्षेत्रात कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी गुड न्यूज आहे...! या कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर भविष्यनिर्वाह निधीसाठी (पीएफ) खोळंबून राहावे लागणार नाही. त्यांना हा निधी निवृत्तीच्या आधीच किंवा निवृत्त होण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत देण्याचा निर्णय 'एम्प्लॉइज प्रॉव्हिडंट फंड ऑर्गनायझेशन'ने (ईपीएफओ) घेतला आहे. त्यामुळे संघटनेच्या चार कोटी कर्मचाऱ्यांना एकाचवेळी पेन्शन आणि पीएफची रक्कम मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्त व्ही. पी. जॉय यांनी कर्मचाऱ्यांच्या हिताचा निर्णय घेतल्याचे पत्रक मंगळवारी उशीरा जारी केले. हे पत्रक 'ईपीएफओ'च्या देशभरातील सर्व कार्यालयांना पाठवण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी झालेल्या चर्चेअंती हा निर्णय घेण्यात आल्याचेही जॉय यांनी स्पष्ट केले. या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी निवृत्त होणाऱ्या सभासदांच्या नावाची यादी तीन महिने आधीच तयार करण्याच्या सूचनाही जॉय यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. या यादीची माहिती संबंधित कर्मचारी आणि तो जेथे कार्यरत आहे, त्या कंपनीलाही दिली जाणार आहे.

संबंधित कंपनीनेही निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्याच्या पीएफ खात्यामध्ये आपले योगदान निवृत्त होण्याच्या तारखेच्या एक महिना आधी जमा करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या शिवाय निवृत्त कर्मचाऱ्याला पीएफ आणि पेन्शनचा अर्ज आधीच पाठवण्यात यावा, असेही 'ईपीएफओ'ने नमूद केले आहे. संबंधित कर्मचाऱ्याने हे दोन्ही अर्ज भरून निवृत्तीच्या तारखेपूर्वी १४ दिवस आधी 'ईपीएफओ'च्या स्थानिक कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे.

कामगार मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी झालेल्या बैठकीतील सूचनेनुसार कामगारमंत्री बंडारू दत्तात्रेय यांनी 'ईपीएफओ'च्या व्यवस्थेचा आढावा घेतला. त्यांनी कर्मचाऱ्यांच्या अकाली मृत्यूनंतर त्यांच्या नातेवाइकांच्या दाव्यांचा किमान वेळेत निपटारा करण्याचे निर्देश संबंधित कर्मचाऱ्यांना दिले.

सात दिवसांमध्ये फायदा

'ईपीएफओ'च्या कोणत्याही सभासदाचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयांना अथवा वारसदारांना त्याच्या खात्यातील जमा निधी 'डेथ बेनिफिट क्लेम' जमा झाल्यानंतर सात दिवसांच्या आत देण्यात येणार आहे. खासगी क्षेत्रात कार्यरत कर्मचाऱ्यांच्या अकाली मृत्यूनंतर त्याचा भविष्यनिर्वाह निधी आणि पेन्शनची रक्कम नातेवाइकांना मिळण्याच्या मार्गातील अडथळ्यांबाबत मोदी यांनी चिंता व्यक्त केली होती. मात्र, त्यानंतर यंत्रणेने कारभारात सुधारणा करून 'डेथ बेनिफिट क्लेम' जमा झाल्यानंतर सात दिवसांच्या आत निधी वारसांना देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

कोळसा पीएफसाठी ॲप

कोळसा व्यवसायाशी संबंधित कामगारांना त्यांचा भविष्यनिर्वाह निधी (पीएफ) पाहता यावा तसेच त्याचे व्यवहार करता यावेत, यासाठी मोबाइल ॲप तयार केल्याचे कोल माइन्स प्रॉव्हिडन्ट फंड ऑर्गनायझेशन (सीएमपीएफओ) या संघटनेने बुधवारी जाहीर केले. या ॲपचा वापर करून सीएमपीएफ सदस्य त्याची पीएफ शिल्लक पाहू शकेल, याशिवाय दाव्याची व तक्रारीची स्थिती यांची माहिती घेऊ शकणार आहे.

गृहकर्जांची रेलचेल

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

सणासुदीच्या वातावरणाचा लाभ उठवण्यासाठी भारतीय स्टेट बँक (एसबीआय) व खासगी क्षेत्रातील आयसीआयसीआय बँक यांनी घर खरेदी करू इच्छिणाऱ्यांना भेट दिली आहे. एसबीआयने गृहकर्जाचा दर विक्रमी ०.१५ टक्के कमी करत गेल्या सहा वर्षांतील नीचांकी आणला आहे. त्याचवेळी आयसीआयसीआय बँकेने गृहकर्जाबरोबरच ओव्हरड्राफ्टची सुविधाही उपलब्ध करून दिली आहे.

एसबीआयची गृहकर्जे बाजारातील सर्वात स्वस्त गृहकर्जे ठरली असून त्यामुळे नव्याने घर घेणाऱ्या तसेच एसबीआयकडे गृहकर्ज वर्ग करण्याची इच्छा असलेल्या ग्राहकांना याचा फायदा होईल, असा दावा बँकेने केला आहे. नव्या दरानुसार पुरुषांना गृहकर्ज ९.१५ टक्के दराने तर महिलांना हेच कर्ज ९.१० टक्के दराने उपलब्ध होईल.

आयसीआयसीआय बँकेने या बँकेत खाते असलेल्या वेतनधारकांना ओव्हरड्राफ्ट सुविधा देऊ केली आहे. बँकेने या वेतनधारकाच्या स्वत:च्या मालकीच्या मालमत्तेवर ओव्हरड्राफ्ट घेताना त्याची मर्यादा पाच लाख रुपयांवरून एक कोटी रुपयांपर्यंत वाढवली आहे. यामुळे ग्राहकाला कर्ज मिळण्याबरोबरच अतिरिक्त रकमेसाठी ओव्हरड्राफ्टदेखील घेता येणार आहे.

टाटा साम्राज्यात फूट?

ईटी वृत्त, मुंबई

टाटा उद्योगसमूहाच्या अध्यक्षपदावरून सायरस मिस्त्री यांना हटवल्यामुळे काळजीवाहू अध्यक्ष रतन टाटा यांनी समूहाला गेलेली प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी कंबर कसली असली, तरी या समूहात फूट पडण्याची चिन्हे दिसत आहेत. सायरस मिस्त्री अद्याप या समूहातील किमान डझनभर घटक कंपन्यांचे अध्यक्ष असल्यामुळे ही स्थिती निर्माण झाल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

सायरस मिस्त्री टाटा मोटर्सचे अध्यक्ष व बिगर कार्यकारी संचालक म्हणून आजही कार्यरत आहेत. याशिवाय जग्वार लँडरोव्हर, टाटा पॉवर व इंडियन हॉटेल्स या कंपन्यांच्या संचालक मंडळावरही ते सक्रिय आहेत. या कंपन्यांमध्ये टाटा सन्सचा मोठा हिस्सा नाही. त्यामुळे मिस्त्री यांना संपूर्ण समूहातून काढून टाकणे मुश्किल होत आहे. काही महत्त्वाच्या कंपन्यांचे संचालक पुढील पंधरवड्यात जुलै ते सप्टेंबर या तिमाहीच्या आर्थिक निकालांची चर्चा करण्यासाठी भेटणार आहेत. या बैठकीत समूहाला किंवा घटक कंपन्यांना एकाच वेळी दोन नायक असल्याने कशा पद्धतीने तोटा होत आहे याचे चित्र या संचालकांकडून गुंतवणूकदारांसमोर ठेवले जाईल, अशी अटकळ आहे. मिस्त्री यांना काढून टाकल्यावर टाटा समूहातील नोंदणीकृत कंपन्यांचे बाजारमूल्य ३.५ अब्ज डॉलरने घसरले आहे. यासंदर्भात टाटा सन्सकडून कोणतीही प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.

सायरस मिस्त्री अनेक घटक कंपन्यांचे अद्याप अध्यक्ष

मिस्त्रींना काढायचे तर...

कंपनी कायदा कलम १६९ अंतर्गत भागधारक या नात्याने टाटा सन्स मिस्त्री यांना संचालक पदावरून हटवण्यासाठी ठराव मांडू शकेल. त्यानंतर संबंधित कंपन्यांचे संचालक मंडळ हा ठराव मतासाठी ठेवेल. त्यानंतर मिस्त्री यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली जाईल. मिस्त्री यांनी त्यांची बाजू मांडण्यास नकार दिल्यास संबंधित कंपनीचे संचालक मंडळ मिस्त्रींविरोधात मतदान करेल. आताच्या परिस्थितीत टाटांकडून मिस्त्री यांना घटक कंपन्या चालवण्यापासून रोखणे शक्य नाही. त्याऐवजी टाटा आपल्या घटक कंपन्यांच्या संचालक मंडळांना मिस्त्री यांच्याविरोधात मतदान घेण्याचा सल्ला देऊ शकेल.

खंबाटा यांचा राजीनामा

माजी अतिरिक्त सॉलिसिटर जनरल डेरियस खंबाटा यांनी सर दोराबजी टाटा ट्रस्टच्या विश्वस्तपदाचा राजीनामा दिला आहे. आपल्या व्यावसायिक बांधीलकी वाढत चालल्यामुळे आपण राजीनामा देत असल्याचे त्यांनी सांगितले आहे. सर दोराबजी टाटा ट्रस्ट ही सर रतन टाटा ट्रस्ट या संस्थेबरोबर असलेली टाटा समूहाची सर्वात मोठी ट्रस्ट आहे. या ट्रस्टमध्ये ६६ टक्के हिस्सा टाटा सन्सचा आहे.

मिस्त्री व शापूरजी पालोनजी समूहाचा हिस्सा

शापूरजी पालोनजी समूहाचा टाटा सन्समध्ये १८.५ टक्के हिस्सा आहे. टाटाच्या नोंदणीकृत कंपन्यांमध्ये शापूरजी पालोनजी समूहाचा एकूण ८१ हजार १४० कोटी रुपये योगदान असून सर्वाधिक ६३ हजार १५८ कोटी रुपये योगदान टीसीएसमध्ये आहे. याशिवाय सायरस मिस्त्री यांची वैयक्तिक गुंतवणूक टीसीएस, इंडियन हॉटेल्स, टाटा केमिकल्स, टाटा मोटर्स, टाटा पॉवर व टाटा ग्लोबल या कंपन्यांतून असून त्यांची एकूण गुंतवणूक ९८२ कोटी रुपये होत आहे.

स्टेट बँकेची ७ हजार एटीएम

मुंबई : भारतीय स्टेट बँकेतर्फे येत्या काही वर्षांत देशभरात सात हजार एटीएम बसवण्यात येणार आहेत. त्यासाठीचे कंत्राट अमेरिकेतील सर्वांत मोठ्या 'एनसीआर कॉर्पोरेशन'या एटीएम उत्पादक कंपनीला देण्यात आले आहे. हे कंत्राट ३३४ कोटी रुपयांचे असून, येत्या सात वर्षांत ही यंत्रणा बँकेकडे सोपवण्यात येणार आहे.

सध्या देशभरात स्टेट बँकेची ५७ हजार एटीएम कार्यरत आहेत. या नव्या एटीएममध्ये ऑनलाइन घोटाळ्यांपासून बचाव करणाऱ्या यंत्रणेचा अंतर्भाव करण्यात येणार आहे. या यंत्रणेमुळे एटीएमवर सायबर हल्ला झाल्यास तो रोखता येणार असून, त्याची माहिती ग्राहकांपर्यंत क्षणार्धात पोहोचवली जाणार आहे.

उद्योजकता विकास कार्यक्रम

सौर उर्जा

सौर व्यवसाय क्षेत्रात उद्योग कसा करावा

राष्ट्रीय उद्योजकता आणि लघु व्यवसाय विकास संस्था (निसबड)

कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय, भारत सरकार

ए-२३, सेक्टर-६२, नॉयडा उ.प्र. - २०१३०९, आयएसओ ९००१:२००८ प्रमाणित

दिनांक - ५ आणि ६ नोव्हेंबर, २०१६ (दोन दिवस)/ **वेळ** : स. १०.०० ते सं. ५.३०

शुल्क : रु. ७,५००/- अभ्यासक्रम शुल्क, प्रमाणपत्र, सॉफ्ट स्टडी मटेरियल दुपारचे जेवण समाविष्ट.

ठिकाण : वैकुंठभाई मेहता रिसर्च सेंटर फॉर डिसेंट्रलाइजड ईडस्ट्रीज (व्हीएमआरसीडीआय), अनुसंधान केंद्र, प्लॉट क्र. १०७, सेक्ट. १५, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई-४००६१४.

अभ्यासक्रमातील घटक - सौर व्यवसायाचा प्रारंभ । केंद्र आणि राज्य धोरण । बिझनेस मॉडेल्स । आरओआय आणि पेबॅक । सौर प्रणालीचे आरेखन आणि बसवणे । तंत्रज्ञान आणि घटक । स्थान पृथ:करण । भारमापन । नोंदणी आणि सरकारी पाठबळ । नेट मीटरिंग पॉलिसी

सौर प्रणाली ऑफ ग्रिड/ ऑन ग्रिड/ थर्मल) व्यवसाय संधी (पॅनेल उत्पादन)

कोणी उपस्थित रहावे?

आर्किटेक्टस । उद्योजक । सल्लागार । व्यावसायिक सेवानिवृत्त व्यक्ति । सेवेत असलेल्या व्यक्ति । कॉर्पोरेटस । अभियंते । विद्यार्थी

प्रात्यक्षिक सत्र । ईमेल आयडी : edpsolartraining@hotmail.com

अधिक तपशिल आणि नोंदणीकरिता संपर्क साधा । मर्यादित जागा

समन्वयक- ९९५३९२०६८९, ९९५३९२०४९८ । www.niesbud.nic.in

प्रमाणपत्र दिले जाईल

शंकासमाधान
हाउसिंग सोसायटी

ॲड. राजीव वाघ
ज्येष्ठ वकील

परिस्थितीनुसार दुरुस्ती खर्च वाटा

● मुंबईच्या पूर्व उपनगरातील आमची 'म्हाडा'ची, १९८०मध्ये बांधलेली, तळमजला व चार मजले अशी २० सदस्यांची सहकारी गृहनिर्माण संस्था आहे. आमची सोसायटी नोंदणीकृत असली, तरी मालमत्तेचे अभिहस्तांतर झालेले नाही. अलीकडेच सोसायटीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत दोन तृतीयांश बहुमताने सदस्यांनी असा ठराव संमत केला, की इमारतीच्या 'स्ट्रक्चरल ऑडिट'च्या अहवालानुसार व शिफारशींप्रमाणे इमारतीच्या बाहेरील दुरुस्ती सभासदांकडून वर्गणी जमा करून करण्यात येईल. प्रत्येक सदनिकेच्या आतील दुरुस्ती मात्र त्यात्या सदनिकामालकाने स्वखर्चाने करून घ्यावी. त्याप्रमाणे १९ सभासदांनी सदनिकांतर्गत दुरुस्तीचे काम स्वखर्चाने करवून घेतले. तळमजल्यावर राहणाऱ्या एका सदस्याच्या सदनिकेच्या छताचे प्लास्टर निघाला असून लोखंडी सळया दिसत आहेत. त्याचे म्हणणे मात्र असे, की हे दुरुस्तीचे काम सोसायटीनेच केले पाहिजे. तो बाहेरील दुरुस्तीच्या कामाची वर्गणी देण्यास नकार देत आहे. सदर बाब आम्ही 'म्हाडा'च्या दुय्यम उपनिबंधकांच्या (सब रजिस्ट्रार) निदर्शनास आणली असता त्यांनी सहकार न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला. या पेचातून आम्ही कसा मार्ग काढावा आणि कायदा काय म्हणतो?

- व्ही. जी. पी., मुंबई.

याबाबतची योग्य कायदेशीर बाजू अशी आहे, की इमारतीच्या सर्व सामायिक भागांच्या दुरुस्तीची जबाबदारी ही 'सोसायटी'ची असते. त्याचप्रमाणे, सदनिकांच्या आतील भागांची दुरुस्ती ही त्या सदस्यांची जबाबदारी असते. परंतु, काही प्रकरणांत, जेथे सदनिकांच्या आतील भागात नुकसान झालेले असेल तर आणि त्याला सदनिकेत राहणारा सदस्य जबाबदार नसेल. उदाहरणार्थ, वरील बाजूच्या सदनिकेतून होणारी गळती किंवा दुरुस्तीच्या कामामुळे नुकसान झाले असेल तर तेथील परिस्थिती वेगळी असते. अशा परिस्थितीत 'सोसायटी' असा निर्णय घेऊ शकते की ज्या सदस्याच्या सदनिकेतून समस्या उद्भवली असेल आणि तीमुळे ज्या सदस्याच्या सदनिकेचे नुकसान झाले असेल त्या दोघांनी मिळून दुरुस्तीचा खर्च करावा. काही सोसायट्यांनी असाही निर्णय घेतला आहे की पूर्ण खर्चामधील काही हिस्सा 'सोसायटी' स्वत: देईल. परंतु, तळमजल्यावरील सदस्याने घेतलेली भूमिका ही योग्य नाही. त्याच्या सदनिकेचे आतील छत दुरुस्त करण्यासाठी येणाऱ्या खर्चातील वाटा त्याने उचलला पाहिजे आणि सर्व खर्च 'सोसायटी'नेच करावा अशी मागणी तो करू शकत नाही.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

बांधकाम विभाग

निविदा सूचना क्र. 81 (२०१६-१७)

आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कामांकरिता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून बी-१ नमुन्यात ४ कामांची निविदा मागवित आहे.

कोरे निविदा फॉर्म व निविदेबाबतच्या सर्व अटी शर्तीची संपूर्ण माहिती महाराष्ट्राचे **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर दि. ३/११/२०१६ ते दि. १७/११/२०१६ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल. भरण्यात आलेल्या निविदा ह्या दि. १७/११/२०१६ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत वरील संकेतस्थळावर अपलोड करणेत याव्यात. प्राप्त निविदा दि. १९/११/२०१६ रोजी स. ११.०० वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येतील.

कोणत्याही कारणास्तव एक किंवा सर्व निविदा रद्द करण्याचा अधिकार आयुक्तांनी राखून ठेवला आहे, याबाबतचा निर्णय अंतिम व निविदाधारकांना बंधनकारक राहील.

निविदेबाबतची अधिक माहिती **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

स्वाक्षरी/-
(प्रमोद कुलकर्णी)
शहर अभियंता,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

जाक्र.कडोंमपा/जसंवि/मुका/८१३
दि. २/११/१६

महामुंबई

अंकलिपी

प्रकारच्या गुन्हेगारीला कशी सुरुवात झाली यापासून ते त्याला बळी न पडण्यासाठी काय सतकर्ता बाळगणे आवश्यक आहे, हे सांगितले आहे.

संपादक- श्रीहरी कानपिळे,
पाने- २१०, किंमत- १२०

मनशक्ती



या दिवाळी अंकात माहिती, मनोरंजन व तत्त्वज्ञान याचा मेळ साधण्यात आला आहे. 'स्वामी विज्ञानानंद-शिक्षणातील प्रयोगशील विचारवंत' हा प्रमोद शिंदे व डॉ. वर्षा तोडमल यांनी लिहिलेला लेख वाचनीय आहे. मेंदूच्या सर्वांगीण विकासासाठी विज्ञानानंद यांनी मांडलेली '१२ गुणांचा विकास' ही थिअरी या लेखात वाचण्यास मिळते. 'विश्व वैज्ञानिकांचे' या लेखात विद्या देशपांडे यांनी रुदरफोर्ड, गॅलिलिओ, आइन्स्टाइन आदी शास्त्रज्ञांच्या संशोधनाचा मागोवा घेतला आहे. स्मृतीबद्दलच्या नवीन संकल्पना (ग. श्री. केळकर), गुरू नव्हे त्राता (के. जी. सावंत), पक्षीनिरीक्षण एक अनुभव (सागर चंदने) आदी लेखही माहितीपूर्ण आहेत. अतुल कहाते यांच्या सायबर क्राइम्स या लेखातून या प्रकारच्या गुन्हेगारीला कशी सुरुवात झाली यापासून ते त्याला बळी न पडण्यासाठी काय सतकर्ता बाळगणे आवश्यक आहे, हे सांगितले आहे.

संपादक- श्रीहरी कानपिळे,
पाने- २१०, किंमत- १२०

ऋतुगंध

मान्यवर लेखकांच्या वैविध्यपूर्ण साहित्याने हा दिवाळीअंक सजला असून निर्मितीमूल्यही उत्तम दर्जाचे आहे. गायक अरुण दाते, अनिल कुंबळे, अंजली दमानिया, ब्रिगेडियर सुधीर सावंत अशा विविध क्षेत्रांतील मातब्बर मंडळींनी आपले विचार मांडले आहेत. राजकीय विषयांवर भाऊ तोरसेकर, भारतकुमार राऊत, प्रा. अविनाश ओक आदींनी अभ्यासपूर्ण मतप्रदर्शन केले आहे. एकाच संकल्पनेवर आधारित कविता असल्या तरीही त्यात वैविध्य आहे. राजकीय सटायर, ब्रेग्झिटचे विश्लेषण, चित्रपटांवरील बंदी आणि काटछाट (अपर्णा पाटील), पाचूच्या बेटावरचे अश्रू (प्रगती बाणखेले) हे लेख विशेष उल्लेखनीय आहेत.

संपादक - सुनील पाटोळे
पाने १००, किंमत ७० रुपये

मोहिनीराज

या दिवाळी अंकाने २७ वर्षांची वाटचाल केली असून दरवर्षीप्रमाणे यंदाचा अंकही कथा, कविता, लेख, व्यंगचित्रे अशा वैविध्यपूर्ण साहित्याने नटला आहे. भूत, भुताटकी आणि विश्वास (पद्मावती जावळे), गुरुमहात्म्य आणि निर्वाण (शीला हिरूरकर), योग धर्मातील उर्जास्त्रोत (अंजली बापट) यांचे लेख आहेत. मुक्ता शिंदे, चंद्रशेखर टिळक, ज्योती आठल्ये, साहेबराव पवळे, सुरेश देहरकर, शंकर घोगरे यांच्या वाचनीय कथा अंकात आहेत.

संपादक - सुभाष झेंडे
पाने ६०, किंमत ७५ रुपये.

वसा

वैचारिक लेख, कथा-कविता, ललित लेख, व्यक्तिविशेष अशा चौफेर साहित्यप्रकारांनी हा अंक सजला आहे. केंद्रात झालेल्या सत्तांतरानंतर दोन वर्षांत राष्ट्रवादाची नवी व्याख्या केली जात आहे व आम्ही सांगू तोच राष्ट्रवाद अशी भावना वाढीस लागल्याचे संपादकीयात म्हटले असून अंकातील बहुतांश लेखन हे याच अनुषंगाने आहे. यात प्रामुख्याने संघाचे आव्हान, आंबेडकर आणि... (सुरेश सावंत), देशभक्ती नव्हे उन्माद (राज असरोंडकर), बुद्धिवादी ते धर्मवादी (समर खडस) हे लेख वाचनीय आहेत. लता प्रतिभा मधुकर यांनी राधिका वेमूला या लेखातून रोहितच्या आईच्या जिद्दीची कहाणी सांगितली आहे. एक सुन्न दुपार आणि बाबू भंगारवाल्याची वखार... ही जयंत पवार यांची कथा चिंतनशील आहे. प्रतिमा जोशी यांच्यासह अन्य कवींच्या कविता तसेच मुकुंद कुळे यांचा बैठकीची घरंदाज लावणी हा लेखही या अंकाची जमेची बाजू आहे.

संपादक- प्रभाकर नारकर,
पाने- १७६, किंमत- रु. १२०

GODFREY PHILLIPS INDIA LIMITED

REGISTERED OFFICE : 'Macropolo Building', Ground Floor, Next to Kala Chowky Post Office, Dr. Babasaheb Ambedkar Road, Lalbaug, Mumbai - 400 033

CORPORATE OFFICE : 49, Community Centre, Friends Colony, New Delhi - 110 025

CIN NO.:L16004MH1936PLC008587

Website: www.godfreyphillips.com; Email: isc–gpi@modi.com

NOTICE

Pursuant to Regulation 29(1)(a) read with Regulation 47(1)(a) of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, it is hereby notified that a Meeting of the Board of Directors of the Company will be held on Friday, the 11th November, 2016 at 1.00 P.M. to, inter-alia, consider, approve and take on record of the Standalone Unaudited Financial Results for the second quarter & half year ended 30th September, 2016.

The information contained in this notice is also available on the Company's Corporate, website www.godfreyphillips.com and on the website of the stock exchanges, www.bseindia.com and www.nseindia.com.

For GODFREY PHILLIPS INDIA LIMITED
Sd/-
(Sanjay Gupta)
Company Secretary

Place : New Delhi
Dated : 2nd November, 2016

जाहीर सूचना

तमाम जनतेस याव्दारे सूचना देण्यात येत आहे की आम्ही मेसर्स मीति डेव्हलपर्स प्रा. लिमिटेड (**"द डेव्हलपर्स"**) यांच्या क्षेत्रफळ ३२५९.८० चौ. मीटर्स असणाऱ्या ज्यात सीटीएस क्र. एफ/४४३/ए/१, ३३ वा रस्ता, टीपीएस-III, बांद्रा (पश्चिम), मुंबई ४०००५० चा समावेश आहे त्या जमिनीवर बांधलेल्या नवीन इमारतीतील **विक्री करिता मुक्त क्षेत्रावर** अडथळ्यांचा शोध घेण्याच्या कारणासाठी त्याचे हक्क, हित, स्वारस्य आणि/ अथवा शिर्षकाची चौकशी करत आहोत आणि चतु:सीमा खालीलप्रमाणे :-

पूर्वेस किंवा पूर्वेकडे	:	सीटीएस क्र. एफ/४३/ए-२ आणि सीटीएस क्र. एफ/४४३-बी;
पश्चिमेस किंवा पश्चिमेकडे	:	१५ वा रस्ता, टीपीएस-III, बांद्रा (पश्चिम);
उत्तरेस किंवा उत्तरेकडे	:	३३ वा रस्ता टीपीएस-III, बांद्रा (पश्चिम), आणि
दक्षिणेस किंवा दक्षिणेकडे	:	सीटीएस क्र. ४४४

(येथे यानंतर एकत्रितरित्या **"सदर मालमत्ता"** म्हणून संदर्भित)

व्यक्ति, हिंदु अनडिव्हायडेड फॅमिली, कंपनी, बँका, वित्तीय संस्था, (संस्थांना), नॉन-बँकिंग वित्तीय संस्था (संस्थांना), संस्था, व्यक्तिंची असोसिएशन अथवा स्वतंत्र व्यक्तिंचे मंडळ समाविष्ट असो किंवा नसो, लेंडर्स आणि अथवा पतदार ज्यांना सदर मालमत्ता अथवा कोणताही भाग किंवा त्याच्या कोणत्याही हिश्श्यावर विक्री, मेमोरँडम ऑफ अंडर स्टँडिंग, देवाणघेवाण, गहाण, तारण, ताबा, भेट, विश्वस्त संस्था, वारसा, वारसा हक्क, कब्जा, भाडेपट्टी, भाडेकरार, प्रतिपाळ अग्रहक्क, परवाना, मृत्युपत्रात लिहून ठेवलेली, भाग, बेचनपत्र, कर्ज फिटेपर्यंत मालमत्ता ताब्यात ठेवण्याचा हक्क, जप्ती, विकास हक्क, राईट ऑफ वे, लिस्पेन्डन्स, आरक्षण, करारनामा, एफएसआय वापर, विकास अधिकार अथवा कोणतेही दायित्व किंवा बांधिलकी किंवा अन्यथा अथवा ज्या कोणत्याही प्रकारच्या मागणीव्दारा हक्क असलेल्या सर्व व्यक्तिंनी याव्दारे त्याविषयी कृपया लेखी स्वरुपात, पुष्ट्यर्थ मूळ कागदपत्रांसोबत निम्नस्वाक्षरीकारांकडे त्यांचे कार्यालय ऑर्बिट लॉ सर्व्हिसेस, बी-१२०१, दलामल टॉवर, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई ४०००२१ येथे ह्या सूचनेच्या प्रसिध्दीच्या तारखेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या कालावधीत सूचित करावे अन्यथा सदर व्यक्ति/व्यक्तिंचे दावे, जर कोणतेही, असतील ते सोडून देण्यात आले आहेत, त्याग केले आहेत, जमा केले आहेत, अधिकार सोडले आहेत, हक्क सोडला आहे, असे समजण्यात येतील, आणि आमच्या अशिलांवर बंधनकारक नसेल आणि कोणत्याही अधिक संदर्भाशिवाय सुयोग्य हक्क प्रमाणपत्र वितरीत केले जाईल.

स्वाक्षरी/-
श्री. पी.व्ही. राव,
वरिष्ठ भागीदार
ऑर्बिट लॉ सर्व्हिसेस

३ नोव्हेंबर, २०१६

भारतीय तटरक्षक दलात दाखल व्हा

(संरक्षण मंत्रालय)

नाविक (देशांतर्गत शाखा) म्हणून १० वी उत्तीर्ण प्रवेश - ०१/२०१७ बॅचकरिता

अभ्यासक्रमाची सुरुवात एप्रिल २०१७



१. भारतीय तटरक्षक दल, आर्मड फोर्सेस ऑफ द युनियन मधे नाविक {देशांतर्गत शाखा (स्वयंपाकी आणि स्ट्युअर्ड)} ह्या पदासाठी भर्तीकरिता, खाली विहीत केल्याप्रमाणे शैक्षणिक पात्रता आणि वय याची पूर्तता करत असलेल्या भारतीय पुरुष उमेदवारांकडून अर्ज मागवण्यात येत आहेत.

२. **शैक्षणिक पात्रता :** केंद्र/ राज्य सरकारव्दारा मान्यताप्राप्त शिक्षण मंडळाकडील एकूण ५०% गुणांसह १० वी इयत्ता उत्तीर्ण. **(खुली राष्ट्रीय चँपियनशीप/आंतरराज्य राष्ट्रीय चँपियनशीप ह्या स्पर्धांमधे कोणत्याही क्रीडा प्रकारात १ ले, २ रे अथवा ३ रे स्थान ज्यांनी प्राप्त केले आहे अशा राष्ट्रीय स्तरावरील अव्दितीय खेळाडू व्यक्तिंकरिता उपरोक्त किमान कट ऑफमधे ५% सवलत. ही सवलत सेवेत असताना मृत्यू झालेल्या तटरक्षक दल गणवेशधारी व्यक्तिच्या पाल्याला सुध्दा लागू होईल.)**

३. **कार्य आवश्यकता :**
(ए) **स्वयंपाकी** त्यांना मेनू नुसार स्वयंपाक तयार करावा लागेल (मांस उत्पादनांच्या हाताळणीचा समावेश असलेले मांसाहारी आणि शाकाहारी दोन्ही) आणि रेशनचा हिशोब ठेवणे. या व्यतिरिक्त, संघटनेच्या कार्यक्षम कारभारासाठी इतर कामे सुध्दा देण्यात येतील.
(बी) **स्ट्युअर्ड** त्यांना वेटर्स म्हणून अधिकाऱ्यांच्या मेसमधे अन्न (जेवणखाण) वाढावे लागेल, हाऊसकिपिंग, निधीचा हिशोब ठेवणे, वाईन आणि कोठार, मेनू तयार करणे इ. करावे लागेल. या व्यतिरिक्त, त्यांना संघटनेच्या कार्यक्षम कारभारासाठी इतर कामेसुध्दा देण्यात येतील.

४. **वय :** ०१ एप्रिल २०१७ रोजी १८ ते २२ वर्षे म्हणजेच ०१ एप्रिल १९९५ ते ३१ मार्च १९९९ दोन्ही तारखांचा समावेश करत त्या दरम्यान जन्म झालेला असावा. (एससी/एसटी करिता वरील वयात ५ वर्षांची सवलत आणि ओबीसी उमेदवारांकरिता ३ वर्षे)

५. **अर्ज केवळ 'सामान्य टपाल'व्दारे स्वीकारण्यात येतील. अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख १५ नोव्हेंबर १६ आहे. उत्तरपूर्व, जम्मू आणि काश्मीर, अंदमान आणि निकोबार बेटे, लक्षव्दीप आणि मिनीकॉय बेटे येथील उमेदवारांकरिता अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख २० नोव्हेंबर, १६ आहे. परीक्षा केंद्रे नॉयडा, कोलकाता, चेन्नई, मुंबई आणि गांधीनगर असतील. अर्जाचा नमुना भारतीय तटरक्षक भर्ती वेबसाईट www.joinindiancoastguard.gov.in वरून डाऊनलोड करता येतील.**

६. **महत्त्वाच्या सूचना :**
(ए) उमेदवार जेथील असतील त्या राज्यासाठी नमूद सूचीतून केवळ एकाच केंद्राची निवड करू शकतात. तटरक्षक दल प्रशासकीय/इतर कारणांकरिता उमेदवाराचे केंद्र बदलणे किंवा विशिष्ट केंद्राची परीक्षा आयोजन रद्द करणे/पुन: आयोजन याचे हक्क राखून ठेवत आहेत.
(बी) विशिष्ट राज्य/केंद्राची कट ऑफ टक्केवारी ही प्राप्त उच्च टक्केवारीसह असलेल्या अर्जांच्या संख्येवर अवलंबून असेल व निर्णय त्यानुसार होईल.
(iii) **उमेदवाराने संपूर्ण जाहीरात वाचणे आवश्यक आहे. परीक्षा केंद्राच्या ठिकाणी नोंदणीच्या वेळी अज्ञान दर्शवणे आणि पात्र